**संदर्भ** – १) नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.छसंम-२०२४/प्र.क्र.०१(भाग-२)/नवि-२४, दि.२७/०७/२०२६.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-अ, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट १३-१९, २०२६.

जा.क्र.मनपा/साप्र(आस्था-१)/२०२६/१४४६.
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक – १९/०८/२०२६.

**कार्यालयीन परिपत्रक** –

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण),नियम २०२१ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिलेली असून सदर शासन निर्णय संदर्भ क्र.२ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्यानुसार स्वच्छता निरीक्षक पदाची नेमणूकीची टक्केवारी व अर्हता खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| नेमणूकीची टक्केवारी | अर्हता |
|---|---|
| नामनिर्देशन / सरळसेवा - ५०% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>ब) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| मर्यादित विभागीय परीक्षा निवडीने -५०% | महानगरपालिकेमध्ये स्वच्छता क्षेत्रामध्ये काम केल्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेल्या व सरळसेवा नियुक्तीसाठीची अर्हता धारण करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून मर्यादित विभागीय परिक्षेच्या माध्यमातून नियुक्ती देण्यात येईल. |

करिता स्वच्छता निरीक्षक हे पद मर्यादित विभागीय परीक्षा निवडीने-५०% भरावयाची असून त्यानुसार उक्त अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांनी खालील कागदपत्रे अर्जासह कार्यालयीन परिपत्रक निर्गमनाच्या दिनांकापासून ०७ दिवसांपर्यंत सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना-१) येथे सादर करावे.

१) पदवी गुणपत्रिका – साक्षांकीत प्रत.
२) स्वच्छता निरीक्षक पदविका प्रमाणपत्र – साक्षांकीत प्रत.
३) महानगरपालिकेमध्ये स्वच्छता क्षेत्रामध्ये किमान ०५ वर्षे काम केल्याचे घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांचे अनुभव प्रमाणपत्र – मूळ प्रत.

Digitally signed by
ABHAY ASHOK PRAMANIK
Date: 19-08-2026
14:41:45

**मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार.**

(अभय प्रामाणिक)
उपआयुक्त (सामान्य प्रशासन)
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रति,

सर्व विभागप्रमुख/शाखाप्रमुख,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या अधिनस्त कार्यरत सर्व गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.